पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ५२८ दिनांक - ११/०७/२०२३**

**युनिट ४, गुन्हे शाखा,पुणे शहर**

## वाहन तोडफोडीसह मोक्याच्या गुन्हयात ०३ महिन्यापासुन फरार असलेले ३ पाहिजे आरोपी राज्य कर्नाटक येथुन अटक

मा.पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी पुणे शहरातील दाखल गुन्हयातील व मकोका मधील पाहिजे / फरारी आरोपी यांचेबाबत विशेष मोहिम राबवुन ते मिळुन आल्यास त्यांना ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाई करीता आदेश दिले आहेत.

प्राप्त आदेशाचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक,गुन्हे शाखा,युनिट ४,श्री.गणेश माने,यांनी वरिलप्रमाणे विशेष मोहिम राबवुन कार्यवाही करणेबाबत सुचना व मार्गदर्शन केले.प्राप्त आदेश व सुचने प्रमाणे पोलीस उप निरीक्षक जयदीप पाटील,व युनिट-४ कडील स्टाफ,यांनी **चतुःश्रृंगी गुन्हा रजि.क्र. २७३/२०२३,भा.द.वि.कलम १२०(ब),३०७,४२७,३२३,५०४,५०६(२),१४३,१४७,१४८,१४९,भा.हत्यार का. कलम ४/२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५,क्रिमीनल लॉ अमेंडमेंट कायदा कलम ७ सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४)** या गुन्हयातील पाहिजे आरोपी यांचेबाबत गोपनिय माहीती काढण्याचे काम करीत होते.पोलीस अंमलदार सारस साळवी,प्रविण भालचीम,यांना त्यांचे बातमीदारामार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की,अजय विटकर व बबल्या देवकुळे हे बेंगलोर राज्य कर्नाटक येथे लपुन-छपुन राहत आहेत.मिळालेली बातमी वरिष्ठांना कळविली असता त्यांनी नमुद ठिकाणी तात्काळ स्टाफ पाठवुन आरोपीतांना कायदेशीर कारवाई कामी ताब्यात घेणेबाबत आदेशीत केले.याप्रमाणे पोलीस उप निरीक्षक जयदीप पाटील व स्टाफ यांचे तपास पथक दि.०९/०७/२०२३ रोजीचे रात्री बेंगलोर कर्नाटक राज्याकरीता रवाना करण्यात आले होते.

दि.१०/०७/२०२३ रोजी तपास पथकाने थलगटपुरा पो.स्टे.बेंगलोर शहर,कर्नाटक राज्य परिसर येथे जावुन दाखल गुन्ह्यातील पाहिजे आरोपीं यांचेबाबत अधिक माहिती घेतली असता ते राजहंस ग्रिन मंगल कार्यालय येथे असलेबाबत माहीती प्राप्त झाली.प्राप्त माहीतीची खात्री करुन छापा कारवाई करुन आरोपी नामे **१)अजय चंद्रकांत विटकर,वय २२ वर्षे,रा.जुनी वडारवाडी,गोखलेनगर,पुणे २)ऋषिकेश ऊर्फ बबल्या सुनिल देवकुळे,वय १९ वर्षे,रा.कुसाळकर,१००१,वडारवाडी,गोखलेनगर,पुणे यांना ताब्यात घेतले.** त्यांच्याकडे गुन्ह्यातील त्यांचे इतर साथीदारांबाबत तपास करता त्यांनी त्यांचा साथीदार अनिल ऊर्फ डॅनी मंगळवेढेकर हा अहमदनगर येथील एम.आय.डी.सी.भागात लपुन राहत आहे अशी माहीती दिली.वरिष्ठांनी लागलीच गुन्हे शाखा,युनिट ४,पुणे शहर कडील स्टाफ असे अहमदनगर करीता रवाना केले.

नमुद पथकाने अहमदनगर एमआयडीसी येथे जावुन गोपनिय माहीती प्राप्त करुन एमआयडीसी अहमदनगर परीसरातुन आरोपी नामे **अनिकेत ऊर्फ डॅनी शंकर मंगळवेढेकर,वय २२ वर्षे,रा.ब्लॉकनं.३३, वडारवाडी,गोखलेनगर,पुणे** यास ताब्यात घेतले.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे शाखा,श्री.अमोल झेंडे, सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे -२,श्री.सतीश गोवेकर यांचे मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.गणेश माने,सहायक पोलीस निरीक्षक विकास जाधव,पोलीस उप-निरीक्षक जयदीप पाटील,श्रेणी पोलीस उप निरीक्षक,महेंद्र पवार व पोलीस अंमलदार,प्रविण भालचिम,सारस साळवी,रमेश राठोड,संजय आढारी, नागेशकुवर,विनोद महाजन,विठ्ठल वाव्हळ या युनिट ०४ चे पथकाने केलेली आहे.